**प्रेस नोट** **दि.१४/०३/२०१९**

## कोरेगाव पार्क पो.स्टे.पुणे शहर

## तक्रारदाराच्या ताब्यात दिला, त्याचा गहाळ झालेला मोबाईल

रिया अनिल राजपूत, रा.तळेगाव दाभाडे, पुणे यांचा दि.२६/१०/२०१८ रोजी विवो वाय-६६ मोबाईल १७ हजार रूपये किंमतीचा वाडिया कॉलेज ग्राऊंड येथे पडून गहाळ झाल्याने, त्याबाबत त्यांनी ऑनलाईन प्रॉपर्टी मिसींग एल आर नं.१९०६२६२०१८ अन्वये दि.२७/१०/२०१८ रोजी नोंद केली.

नमूद विवो वाय-६६ या मोबाईल संदर्भात दिलेल्या मिसींगची माहिती पोलीस कर्मचारी विनोद साळुंखे कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन, पुणे यांनी घेवून सदर मोबाईलचा आयएमईआय नंबर ट्रेसिंगला लावला. सदर तांत्रिक विश्लेषणावरून सदरचा मोबाईल हा इसम नामे सिद्धार्थ दत्ताराव नरवाडे, रा.एमआयटी कॉलेजसमोर गार्डन शेजारी, पुणे यांचे ताब्यात असल्याचे समजून आल्याने, त्यांचेशी संपर्क करून मोबाईल ताब्यात घेवून, तो रिया अनिल राजपूत यांना परत केलेला आहे. अशा प्रकारे श्री.मदन बहाद्दरपुरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कोरेगाव पार्क पोलीस ठाणे, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी विनोद साळुंखे यांनी तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे मोबाईल शोधून काढलेला आहे. मोबाईल परत मिळाल्याने तक्रारदार यांनी पोलीसांना धन्यवाद दिले.

(मदन बहाद्दरपुरे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
कोरेगाव पार्क पो.स्टे.पुणे